सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत "उन्नत शेती समृध्द शेतकरी मोहिम अंतर्गत कृषि जन जागृती प्रकल्प" राबविण्यास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत ......

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः कृविका ०५१७/प्र.क्र.७५/३-अे**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २९ जानेवारी, २०१८

**वाचा -**

१) कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.कृविका ०३१७/ प्र.क्र.१८/राकृवियो कक्ष, दि. १३.४.२०१७
२) राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समितीच्या २४ व्या बैठकीचे इतिवृत्त -शासन पत्र क्र. राकृवि-१११७/प्र.क्र. ११/१४अे, दि.२.१.२०१८

**प्रस्तावना -**

राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समिती ( SLSC) च्या दि. १५.१२.२०१७ च्या २४ व्या बैठकीत "उन्नत शेती समृध्द शेतकरी मोहिम अंतर्गत कृषि जन जागृती प्रकल्प "सन २०१७-१८ मध्ये राबविण्यास सुधारित मान्यता देण्यात आली आहे व प्रस्तुत प्रकल्प राबविण्यासाठी ₹. ३०८.५० लाखाचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तदनुषंगाने, हा प्रकल्प सन २०१७-१८ मध्ये राबविण्यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय-**

सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत "उन्नत शेती समृध्द शेतकरी मोहिम अंतर्गत कृषि जन जागृती प्रकल्प" राबविण्यासाठी ₹. ३०८.५० लक्ष (अक्षरी रुपये तीनशे आठ लक्ष पन्नास हजार फक्त) एवढ्या प्रकल्प खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. प्रशासकीय मान्यतेचे आर्थिक घटक सोबतच्या तक्त्यात क्र.१ ते क्र.५ येथे नमूद करण्यात आले आहेत.

**( रु. लाखात )**

| **अ.क्र.** | **घटक** | **सुधारित आराखड्यानूसार एकुण किमंत (₹)** |
|---|---|---|
| १. | विभागस्तरीय कार्यशाळा / चर्चासत्राचे आयोजन | ६.०० लक्ष |
| २. | प्रिंट मिडीया , आकाशवाणी , दुरदर्शन , वर्तमानपत्रांमधून स्थानिक जाहिराती तसेच तंत्रज्ञान प्रचार व प्रसिद्धी | १७७.५० लक्ष |
| ३. | नाविन्यपुर्ण घटक (चित्ररथ -२०१८) | २५.०० लक्ष |
| ४. | केंद्र शासन आयोजित केलेल्या राष्ट्रीय / अंतराष्ट्रीय प्रदर्शनामध्ये सहभाग | १००.०० लक्ष |
| ५. | प्रशासकीय निधी / आकस्मिक खर्च १% | - |
| | **एकुण** | **३०८.५० लक्ष** |

२. सदर प्रकल्प राबविण्यासाठी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांना कार्यक्रमाचे कार्यान्वयन तसेच संनियंत्रण करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यानुषंगाने संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी प्रस्तुत प्रकल्प राबविण्याकरीता संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये "उन्नत शेती समृध्द शेतकरी मोहिम" राबविण्यासाठी निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन कृषि विभागाच्या कार्यालयीन पध्दतीत अंतर्भाव करावा. सदर प्रकल्प रकमेच्या १ टक्का निधी आकस्मिक खर्चाकरीता उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

३. या शासन निर्णयान्वये प्रकल्प राबविण्यासाठी चालू वर्षी उपलब्ध करुन देण्यात येत असलेला **₹. ३०८.५० लक्ष (अक्षरी रुपये तीनशे आठ लक्ष पन्नास हजार फक्त)** निधी या चालू वित्तीय वर्षअखेर पर्यंत खर्च करावा. तसेच संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी निधी विनियोगाची उपयोगिता प्रमाणपत्रे शासनास वेळोवेळी सादर करण्याची कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२५१६२५१९५३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chandrakumar Vithal Ghaytadak

Digitally signed by Chandrakumar Vithal Ghaytadak
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=034948ccd1f6b6c67380c817b34a9af75fcfa679a4609321f9da27d9ab87b0d1, cn=Chandrakumar Vithal Ghaytadak
Date: 2018.01.29 12:46:32 +05'30'

**(चं.वि.घायतडक)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति-**

१) आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) संचालक (विस्तार व प्रशिक्षण) तथा कृषि नोडल अधिकारी, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे,

**प्रत,**

१) मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
२) मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
३) महालेखापाल, (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
४) महालेखापाल, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र-२, नागपूर
५) महासंचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, व्हीआयपी रोड धरमपेठ, नागपूर
६) सर्व संचालक / कृषि सहसंचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७) सर्व विभागीय कृषि सहसंचालक
८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
९) अवर सचिव/कार्यासन-राकृवियो, कार्यासन २ अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
१०) वित्त विभाग कार्यासन व्यय-१/अर्थ-३, नियोजन विभाग कार्यासन १४३१, मंत्रालय,मुंबई ३२.
११) निवड नस्ती (का.३ अे)